महाराष्ट्र राज्याचे क्रीडा धोरण -२०१२
क्रीडा शिक्षकांसाठी प्रशिक्षण शिबिरांचे आयोजन

# महाराष्ट्र शासन
## शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
## शासन निर्णय क्रमांकः राक्रीधो-२०१२/प्र.क्र.२५०/१२/क्रीयुसे-२,

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२,
तारीखः २८ एप्रिल, २०१४.

**वाचा -**

१) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांकः क्रीडाधो-२०११/प्र.क्र.५५/११/क्रीयुसे-१, दिनांक १४ जून, २०१२.

**प्रस्तावना -**

राज्यात क्रीडा संस्कृतीचे संवर्धन, प्रचार, प्रसार व जोपासना करण्यासाठी पोषक वातावरण असणे आवश्यक आहे. याच भूमिकेतून राज्याचे क्रीडा धोरण,२०१२ घोषित करण्यात आले असून, त्याची अंमलबजावणी करण्याबाबत दिनांक १४.६.२०१२ चा शासन निर्णय निर्गमित झाला आहे. या क्रीडा धोरणातील मुद्दा क्रमांक-६.५ हा क्रीडा शिक्षकांसाठी प्रशिक्षण शिबिरांचे आयोजन करण्याबाबत आहे. खेळामधील बदललेले आधुनिक तंत्रज्ञान, प्रशिक्षणाच्या पध्दती, खेळामधील कौशल्याची ओळख, नवीन खेळांची ओळख, खेळांची शास्त्रोक्त माहिती वेळोवेळी शिक्षकांना करुन देणे आवश्यक आहे. तालुका, जिल्हा, विभाग, राज्यस्तरावर क्रीडा शिक्षकांच्या ज्ञानामध्ये भर पडावी व वेळोवेळी क्रीडा क्षेत्रामध्ये होणारे बदल अवगत होण्यासाठी राज्यातील शालेय शिक्षण विद्यार्थ्यांना योग्य क्रीडा प्रशिक्षण मिळण्यासाठी क्रीडा शिक्षकांचे अद्ययावत प्रशिक्षण असणे आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर क्रीडा प्रशिक्षकांसाठी प्रशिक्षण शिबिरांचे आयोजनाबाबत योजना तयार करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय-**

या योजनेस “क्रीडा शिक्षकांसाठी प्रशिक्षण शिबिरांचे आयोजन” असे संबोधण्यात यावे.

२. योजनेसाठी पात्र क्रीडा शिक्षक जिल्हा परिषद प्राथमिक व माध्यमिक शाळा/शासन मान्यताप्राप्त अनुदानित विनाअनुदानित प्राथमिक, माध्यमिक/उच्च माध्यमिक शाळा यातील क्रीडा शिक्षक या प्रशिक्षण शिबिरासाठी पात्र असतील.

३. योजनेचे स्वरूप:-

(i) या प्रशिक्षणाद्वारे विविध वयोगटातील खेळाडू घडविणे व खेळाडूच्या कामगिरीत प्राविण्य निर्माण करण्याच्या दृष्टीने क्रीडा शिक्षकांच्या ज्ञानात भर पडावी व त्यादृष्टीने जिल्हयातील क्रीडा शिक्षकांची क्रीडाविषयक उजळणी करून दरवर्षी होणारे नियमातील बदल त्यांच्या निदर्शनास आणून त्याची माहिती अवगत करुन देण्यात येईल.

(ii) प्रशिक्षणाच्या अद्ययावत पध्दतीची माहिती देण्यास्तव दरवर्षी राज्यस्तरीय मास्टर ट्रेनर शिबिर प्रत्येक जिल्ह्यातील १० शिक्षकांकरिता याप्रमाणे ३५० शिक्षकांकरिता आयोजित करणे, या मास्टर ट्रेनर कडून जिल्हास्तरीय शिबिरामध्ये मार्गदर्शन केले जाईल.

(iii) क्रीडा धोरणातील प्राधान्यक्रमातील १९ खेळांचे तज्ज्ञ क्रीडा प्रशिक्षक किंवा संघटनेचे तांत्रिक पदाधिकारी तसेच आहारतज्ज्ञ, शरीरविज्ञान तज्ज्ञ, क्रीडा मानसोपचार तज्ज्ञ यांना तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून निमंत्रित केले जाईल.

(iv) जिल्हास्तरावर १०० उच्च माध्यमिक / माध्यमिक / प्राथमिक क्रीडा शिक्षकांचे दहा दिवसांचे प्रशिक्षण शिबिर क्रीडा विभागामार्फत आयोजित करण्यात येईल. मास्टर ट्रेनरकडून तसेच तज्ज्ञ क्रीडा मार्गदर्शकाकडून जिल्हास्तरीय शिबिरामध्ये मार्गदर्शन केले जाईल.

(v) या दोन्ही स्तरावरील शिबिरामध्ये क्रीडा गणवेश, क्रीडा साहित्य, क्रीडा हस्तपुस्तिका, भोजन व निवास, मानधन, प्रवास खर्च, सादिल खर्च इत्यादी बाबींवर खर्च केला जाईल.

४. शिबिरांचा अंदाजित खर्चाचा तपशिल:-

**अ) राज्यस्तरीय मास्टर ट्रेनर शिबीराचा अंदाजीत खर्च:राज्यस्तरीय मास्टर ट्रेनर शिबीराकरिता प्रत्येक जिल्हयातून दहा शारीरिक शिक्षक प्रशिक्षण घेण्याकरिता येतील.**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | प्रशिक्षणार्थी निवास व भोजन रु.२५०/- प्रती व्यक्ती (सकाळ चहा नाश्ता,दुपारचे जेवण,रात्रीचे जेवण ) | ३५० (व्यक्ती) x रू२५० (प्रति व्यक्ती प्रति दिन) x१०दिवस = | रु.८,७५,०००/- |
| २ | क्रीडा साहित्य व हस्तपुस्तिका | ३५०(व्यक्ती) x रू ५५० (प्रति व्यक्ती) = | रु.१,७५,०००/- |
| ३ | क्रीडा मार्गदर्शकांचे निवास व भोजन | १० (क्रीडा मार्गदर्शक) x रू २५०x१०दिवस = | रु.२५,०००/- |
| ४ | क्रीडा मार्गदर्शकांचा प्रवासभत्ता | १० xरू १००० = | रु.१० ,०००/- |
| ५ | तज्ज्ञं मार्गदर्शकांचे मानधन,(क्रीडा धोरणातील प्राध्यान्यक्रमातील १९ खेळापैकी तज्ञ क्रीडा प्रशिक्षक किंवा संघटनेचे पदाधिकारी (आहारतज्ञ, शरीरविज्ञान तज्ञ, क्रीडा मानसोपचार तज्ञ ) यांचा समावेश राहील. | रू १०००x३० = | रु.३०,०००/- |
| ६ | तज्ज्ञाचा प्रवासभत्ता | रू १०००x३० = | रु.३०,०००/- |
| ७ | मास्टर ट्रेनर प्रशिक्षणार्थीचा प्रवास भत्ता | ३५०x रू१००० = | रु.३,५०,०००/- |
| ८ | प्रशिक्षण गणवेश | ३६०(प्रशिक्षणार्थी व मार्गदर्शक)x रू ७०० = | रु.२,५२,०००/- |

| | | | |
|---|---|---|---|
| ९ | सादील खर्च (किरकोळ खर्च, फोटोग्राफस, व्हिडीओ शूटींग,उद्धाटन व समारोप समारंभ, स्टेशनरी,पाहुण्यांचे चहापान प्रथमोपचार साहित्य प्रमाणपत्रे इ.) | | रु. ५०,०००/- |
| | **एकूण राज्यस्तरीय प्रशिक्षण शिबिराचा खर्च** | | **रु.१७,९७,०००/-** |

**ब) जिल्हास्तर शिबीराचा अंदाजीत खर्च:-**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | निवास व भोजन रु.२५०/- प्रती व्यक्ती (सकाळ चहा नाश्ता,दुपारचे जेवण,रात्रीचे जेवण) | १००(प्रशिक्षणार्थी)xरू२५०x १०(दिवस) = | रु.२,५०,०००/- |
| २ | क्रीडा साहित्य व हस्तपुस्तिका | १००x रू ५०० = | रु.५०,०००/- |
| ३ | क्रीडा मार्गदर्शकांचे निवास व भोजन | १०xरू२५०x१० = | रु.२५,०००/- |
| ४ | क्रीडा मार्गदर्शकांचा प्रवासभत्ता | १०xरू२५० = | रु.२,५००/- |
| ५ | तज्ज्ञं मार्गदर्शकांचे मानधन,(क्रीडा धोरणातील प्राध्यान्यक्रमातील १९ खेळापैकी तज्ज्ञं क्रीडा प्रशिक्षक किंवा संघटनेचे पदाधिकारी (आहारतज्ञ,शारिरविज्ञान तज्ज्ञं,क्रीडा मानसोपचार तज्ज्ञं ) यांचा समावेश राहील. | रू १०००x१० = | रु.१०,०००/- |
| ६ | मास्ट ट्रेनर मानधन | रु.१०००x१० = | रु.१०,०००/- |
| ७ | प्रशिक्षण गणवेश | रु.७००x१०० = | रु.७०,०००/- |
| ८ | शिबीरार्थीचा प्रवास भत्ता | रु.२००x१०० = | रु.२०,०००/- |
| | सादील खर्च (किरकोळ खर्च फोटोग्राफस, व्हिडीओशूटींग, उद्धाटन व समारोप समारंभ, स्टेशनरी, पाहुण्याचे चहापान, प्रथमोपचार साहित्य, प्रमाणपत्रे इ.) | | रु.२५,०००/- |
| | एकूण जिल्हयास्तर शिबीरांचा अंदाजित खर्च एका जिल्हयाकरिता | | रु.४,६२,५००/- |
| | जिल्हा स्तरावरील शिबीराचा एकूण खर्च रु .४,६२,५००x एकूण जिल्हे ३५ = | | रु.१,६१,८७,५००/- |
| | (अ) + (ब) एकूण जिल्हा व राज्यस्तरीय प्रशिक्षण शिबीराचा खर्च | | रु.१,७९,८४,५००/- |

- उपरोक्त नमूद प्रवासभत्याबाबत दर नमूद असले तरी शिबिरासाठी नियुक्त राज्य शासनाचे क्रीडा मार्गदर्शक तसेच शासकीय /निमशासकीय क्रीडा शिक्षक यांना त्यांच्या वेतनश्रेणी व संवर्गानुसार देय असणाऱ्या दराने प्रवासभत्ता देय राहील.
- शिबिर आयोजनासाठी शासनाची क्रीडा संकुले व क्रीडा प्रबोधिनी यातील सुविधांचा प्राथम्याने वापर करुन किमान खर्च करावा.

**५. मास्टर ट्रेनर निवडीसाठी निकष खालील प्रमाणे असतील :-**

अ) जिल्हयातील ज्या शाळांचे अधिक संघ शालेय क्रीडा स्पर्धामध्ये सहभाग घेऊन प्राविण्य मिळवत असतील तसेच त्यांचे कडे क्रीडा सुविधा उपलब्ध असतील त्यांच्या शिक्षकांना प्राधान्य द्यावे.

ब) जिल्हयामध्ये विद्यालये व कनिष्ठ महाविद्यालये यांचे जाळे असणाऱ्या शिक्षण संस्थामधील प्रशिक्षणांनतर किमान १० वर्षे सेवा शिल्लक असणाऱ्या क्रीडा शिक्षकांचा विचार करावा.

क) राज्य व राष्ट्रीय स्तरावरील खेळाडू तसेच उच्चतम क्रीडा अर्हता (एनआयएस, एमपीएड, इत्यादी) असणाऱ्या क्रीडा शिक्षकांचा विचार करावा.

ड) जिल्हयातील मास्टर ट्रेनरची निवड जिल्हा क्रीडा अधिकारी यांनी विभागीय उपसंचालकांच्या मान्यतेने करावी.

इ) मास्टर ट्रेनर म्हणून प्रशिक्षण घेतलेल्या शिक्षकाऐवजी इतर क्रीडा शिक्षकाची निवड पुढील वर्षाचे राज्यस्तरीय प्रशिक्षणास करावी.

**६. जिल्हास्तरीय शिबिरार्थी निवडीसाठी निकष खालील प्रमाणे असतील :-**

जिल्हास्तरीय शिबिरार्थी निवडताना मास्टर ट्रेनर निवडीसाठी असणाऱ्या निकषासोबतच (शिबिरार्थी निवड वगळता) सर्व तालुक्यांना प्रतिनिधीत्व द्यावे. या योजनेत आगामी काळात जिल्हयातील सर्व क्रीडा शिक्षक प्रशिक्षित होतील असे नियोजन करावे. जिल्हास्तरीय शिबिरार्थीच्या निवडीचे अधिकार जिल्हा क्रीडा अधिकाऱ्यांना राहतील. एकदा जिल्हास्तरीय प्रशिक्षण शिबिराचा लाभ घेतलेल्या क्रीडा शिक्षकाला पुढील किमान तीन शैक्षणिक वर्षे या शिबिराचा लाभ घेता येणार नाही.

७. या शासन निर्णयातील तरतूदी निर्णयाच्या दिनांकापासून अंमलात येतील.

८. या योजनेकरिता होणारा खर्च २२०४-क्रीडा व युवक सेवा- १०४ क्रीडा व खेळ (२०) माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयात खेळांचे प्रचालन, (२०) (०२) क्रीडा शिक्षकांसाठी प्रशिक्षण शिबिर आयोजित करणे (२२०४ ५५५५) या लेखाशीर्षाखाली टाकण्यात यावा. या प्रयोजनार्थ आयुक्त/संचालक, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना अनुदान मंजूरीस अधिकार राहतील तर जिल्हा क्रीडा अधिकारी यांना "आहरण व संवितरण अधिकारी " म्हणून घोषित करण्यात येत आहे.

सदरहू शासन निर्णय नियोजन विभागाच्या संमतीने तसेच वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक २०६/व्यय-५ दिनांक २.३.२०१३ अन्वये मिळालेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१४०४२९१७४४३११३२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rajshekhar Chandrakant Patil

Digitally signed by Rajshekhar Chandrakant Patil
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=School Education and Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Rajshekhar Chandrakant Patil
Date: 2014.04.29 17:51:00 +05'30'

**(रा.चं.पाटील)**
अवर सचिव,महाराष्ट्र शासन

प्रत,

(१) मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
(२) मा.उप मुख्यमंत्र्यांचे सचिव,
(३) सचिव,शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,मंत्रालय,मुंबई,
(४) आयुक्त/संचालक, क्रीडा व युवकसेवा,पुणे
(५) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता),महाराष्ट्र-१/२,मुंबई/नागपूर
(६) महालेखापाल (लेखा व परिक्षा),महाराष्ट्र-१/२,मुंबई/नागपूर
(७) नियोजन विभाग (का.१४७१)मंत्रालय,मुंबई
(८) वित्त विभाग ( व्यय-५),मंत्रालय,मुंबई
(९) संचालक,प्राथमिक/माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण,पुणे
(१०) सर्व उपसंचालक,क्रीडा व युवकसेवा (संचालनालयमार्फत),
(११) सर्व जिल्हा क्रीडा अधिकारी (संचालनालयमार्फत),
(१२) ग्रंथपाल,विधीमंडळ ग्रंथालय,विधानभवन,मुंबई,
(१३) मा.मंत्री (क्रीडा व युवक कल्याण) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय मुंबई,
(१४) मा. राज्यमंत्री (क्रीडा व युवक कल्याण) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय मुंबई,
(१५) निवड नस्ती ( क्रीयुसे-१,क्रीयुसे-२ व क्रीयुसे-३)